गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष २ रे | अंक ०८ वा | शनिवार २५ मे २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 08 | Date : 25/05/2024 blow Saturday Page 4 Price 4

# मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज** : लोकसभा निवडणुकीदरम्यान मतदान केंद्रावर झालेल्या मतदानाची आकडेवारी ( फॉर्म १७ क ) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यासंदर्भात निवडणूक आयोगाला निर्देश द्यावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरु असताना मनुष्यबळाअभावी निवडणूक आयोगाला असे करणे शक्य नाही. त्यामुळे सद्यस्थितीत असे निर्देश देता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' आणि 'कॉमन कॉज' या स्वयंसेवी संस्थांनी यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती दिपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने सद्यस्थितीत असे निर्देश निवडणूक आयोगाला देता येणार नाही, असं स्पष्ट केले. तसेच न्यायालयीन सुट्टीचा काळ संपल्यानंतर ही याचिका योग्य खंडपीठाकडे सुचीबद्ध केल्या जाईल, असेही न्यायालयाने नमूद केले.

दरम्यान, गेल्या शुक्रवारीसुद्धा या याचिकेवर । पान २ वर

## दुष्काळाचा वणवा उरी पेटला!
# महाराष्ट्राच्या घशाला कोरड अन् डोक्यावर दुष्काळाचे ढग

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मे महिन्याचा शेवटचा आठवडा सुरू झाला, तळपणारा सूर्य मी म्हणू लागलाय. साठवलेल्या पाण्याची वाफ आभाळाकडे धावतेय आणि आभाळ मात्र उन्हाच्या झळा देतंय. महाराष्ट्राच्या बहुतांश भागात जमिनी भेगाळल्यात, पिकं करपलीयेत अन् पाणीसाठा घटतोय. तर चिंता दिवसागणिक वाढू लागलीय. राज्यावरील दुष्काळाच्या छायेने काळजामधील काळजीत भर घातलीय.एका खांद्यावर कळशी आणि दुसऱ्या हातात लहानगं बाळ घेऊन महिलांची पायपीट चाललीय ती घोटभर पाण्यासाठी. पाणी कुठे मिळेल हे माहीत नाही, पण तरीही घराबाहेर पडायचं आणि पाण्याचा शोध घ्यायचा. जिथे पाणी मिळेल तिथून ते घ्यायचं आणि पुन्हा पायपीट करत घरी यायचं. धाराशिवच्या अनेक गावांची तहान या महिलांच्या डोक्यावरच्या हंड्यावर अवलंबून आहे.



जिथं माणसांना प्यायला पाणी मिळेना, तिथं आता शेतीतील बागांना ओलावा कुठून मिळणार? असं मोठं प्रश्नचिन्ह हिंगोलीतल्या शेतकऱ्यांपुढे निर्माण झालंय. हिंगोलीच्या असोला गावातील शेतकरी बालाजी ढोबळे यांनी त्यांच्याकडील विहिरीच्या भरवशावर दोन एकर केळीची लागवड केली. मात्र पाणी नसल्यामुळे केळी जमिनीवर सुकून पडल्या, तर पपईचं फळ झाडावरच काळवंडून गेलं. निसर्ग सौंदर्याचं वरदान लाभलेलं आणि एरवी निसर्ग संपदेमुळे नंदनवन असलेल्या मेळघाटातही पाण्याची भीषण टंचाई निर्माण झालीय. खडीमल गावात टँकर आला रे आला की महिला, मुलं आणि कच्चा-बच्चांची नुसती मुरकंड पडतेय. महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरच्या वेशीवरील ईसासनी गावातली अशीच काहीशी परिस्थिती. ३० हजार लोकवस्ती असलेल्या या गावातील ग्रामस्थांना तहान भागवण्यासाठी पाणी चक्क विकत घ्यावं लागतंय. रोज १५ खासगी टँकर १५० फेऱ्या मारत भाजीपाला विकावा तसं पाणी विकत असल्याची विषण्ण करणारी परिस्थिती इथं निर्माण झालीय.

तहान भागवण्यासाठी नाशिककरांची ज्यावर मदार असते, त्या गंगापूर धरणाचा तळ आता उघडा पडलाय. । पान २ वर

# बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठीचे अर्ज २७ मे पासून भरता येणार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) परीक्षेचा निकाल २१ मे रोजी जाहीर झाला आहे. मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणार असून या परीक्षेत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना २७ मे पासून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार असल्याची माहिती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दिली आहे.

उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ट न झालेले), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे तसेच आयटीआय विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे ट्रान्सफर ऑफ क्रेडिट घेणारे विद्यार्थी) सोमवार २७ मे पासून शुक्रवार ७ जून २०२४ या कालावधीत नियमित शुल्कासह भरता येणार आहेत. तर विलंब शुल्कासह अर्ज ८ जून ते १२ जून २०२४ या कालावधीत भरता येतील.

उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाची तारीख ३१ मे ते १५ जून २०२४ अशी असून उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख मंगळवार १८ जून २०२४ अशी आहे.

पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फतच ती भरावीत. आवेदनपत्रे ऑनलाइन पद्धतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे राज्य मंडळामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## मेधा पाटकर दोषी!
# दिल्ली न्यायालयाचा निकाल



नवी दिल्ली : नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्लीच्या साकेत न्यायालयाने २००१ सालच्या एका प्रकरणात दोषी ठरवलं आहे. दिल्लीचे सध्याचे नायब राज्यपाल व्हीके सक्सेना यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात मेधा पाटकर यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. व्हीके सक्सेना यांनी मेधा पाटकर यांच्यावर खोटे आरोप, उपहासात्मक वक्तव्ये आणि बदनामी केल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. व्हीके सक्सेना यांनी गुजरातच्या संसाधनांचा परकीय । पान २ वर

# विधानपरिषद शिक्षक, पदवीधर मतदारसंघाची २६ जून रोजी द्वैवार्षिक निवडणूक

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांसाठी निवडणूक होत असून सोमवार, २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे. विलास विनायक पोतनीस (मुंबई पदवीधर मतदारसंघ), निरंजन वसंत डावखरे (कोकण पदवीधर मतदारसंघ) किशोर भिकाजी दराडे (नाशिक शिक्षक मतदारसंघ) आणि कपिल हरिश्र्चंद्र पाटील (मुंबई शिक्षक मतदारसंघ) हे सदस्य दिनांक ७ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाने २ शिक्षक मतदारसंघ आणि २ पदवीधर मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी शुक्रवार, ३१ मे २०२४ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. त्यानंतर शुक्रवार, ७ जून २०२४ पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येईल. उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जांची छाननी सोमवार, १० जून २०२४ रोजी केली जाईल तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत बुधवार, १२ जून २०२४ अशी आहे. बुधवार २६ जून २०२४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत या चारही मतदारसंघाकरिता मतदान होईल. सोमवार १ जुलै २०२४ रोजी मतमोजणी होईल.

ही संपूर्ण प्रक्रिया दिनांक ५ जुलै २०२४ रोजी पूर्ण होईल, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# धाराशिव, तुळजापूरला अवकाळीचा तडाखा; अनेकांचे संसार उघड्यावर, जनावरेही जखमी

**धाराशिव/दैनिक यशसिध्दि न्यूज**

धाराशिव व तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण भागाला गुरूवारी रात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने झोडपून काढले. वादळी वाऱ्यामुळे धाराशिव तालुक्यातील इर्ला, भंडारवाडी, दाऊदपूर व तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ, अणदूर, खुदावाडी या परिसरातील अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेल्याने संसार उघड्यावर आले आहेत. कुठेही जीवितहानी झाली नाही. मात्र बागायती पिके, घरांचे नुकसान होवून आर्थिक हानी झाली आहे. तर झाडे व पत्रे पडून जनावरे जखमी झाले आहेत.



धाराशिव तालुक्यातील इर्ला, दाऊदपूर व भंडारवाडी येथे गुरूवारी रात्री अचानक झालेल्या वादळी वारा व पावसामुळे शेतकरी बांधवांच्या पपई, लिंबू, संत्री, केळी अशा बागांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच घरावरील पत्रे उडून अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. शुक्रवारी सकाळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नुकसानग्रस्त गावांना भेटी देवून नुकसानग्रस्त बागा, घरे आणि जखमी जनावरांची पाहणी केली व शेतकर्यांशी चर्चा केली. तसेच महसूल प्रशासनाला तत्काळ नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना केल्या. तुळजापूर तालुक्यातील अणदूर, खुदावाडी, कुन्सावळी, मंगरूळ या भागातही मोठ्या प्रमाणात वादळी वारे होते. पाऊस कमी व वादळी वारे तीव्र स्वरूपाचे असल्याने अनेक ठिकाणी रस्त्यालगतची झाडे उन्मळून पडल्याने वाहतूक खोळंबली होती. आमदार पाटील यांनी । पान २ वर

# पुणे अपघात प्रकरण, विशाल अग्रवालला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे अपघात प्रकरणी विशाल अग्रवालला आता १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पुणे पोलिसांनी विशाल अग्रवालची पोलिस कोठडी देण्यात यावी अशी मागणी केली होती, पण न्यायालयाने ती फेटाळली आणि १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे आता विशाल अग्रवालच्या जामीनाचा मार्ग मोकळा झाला आहे. सोमवारी जामिनासाठी अर्ज केला जाणार आहे अशी माहिती आरोपीच्या वकिलांनी दिली आहे.



विशाल अग्रवालच्या अल्पवयीन मुलाने दारू पिऊन भरधाव वेगाने गाडी चालवली आणि त्यामुळे दोघांचा जीव गेल्याची घटना घडली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी विशाल अग्रवालवर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती. आता न्यायालयाने विशाल अग्रवालला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणातील विशाल अग्रवालसोबत सर्वच सहा आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यानंतर आता विशाल अग्रवाल हे उच्च न्यायालयात जाऊ शकतात आणि जामीनासाठी अर्ज करू शकतात.

विशाल अग्रवालवर पुणे पोलिसांकडून आणखी दोन गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती आहे. कलम २०१ अंतर्गत पुरावा नष्ट करण्याचा । पान २ वर



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी कराड (जि.सातारा)येथे पत्रकार संघाचे आरोग्य सेलचे प्रमुख आणि ह्यूमन जनर्ल चे मुख्य संपादक डॉ.अमितकुमार खाडे, यांच्या क्लिनिकला धावतीभेट दिली.त्यावेळी शहरातील पत्रकारांनी स्वागत करून संवाद साधला.यावेळी पत्रकार सुनील चव्हाण, सूर्यकांत पाटणकर,विलास कदम आदी मान्यवर पत्रकार उपस्थित होते. यावेळी डॉ.अमित खाडे यांना नुकतीच पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार ही करण्यात आला.

# माळढोक दर्शनाने पर्यावरणप्रेमी सुखावले ; कृत्रिम प्रजनन केंद्र कागदावरच

**सोलापूर/प्रतिनिधी**

दुर्मीळ माळढोक पक्ष्यासाठी प्रसिध्द असलेल्या सोलापूरजवळील नान्नज माळढोक अभयारण्यात तीन वर्षानंतर माळढोक पक्ष्याचे दर्शन घडले. पंधरा वर्षांपूर्वी माळढोक पक्षी नियमित आढळायचे. परंतु अलिकडे या पक्ष्याचे अस्तित्वच धोक्यात आले असून तीन-चार वर्षांनी कधी तरी एकदा माळढोक पाहायला मिळतो. बुध्द पौर्णिमेचे औचित्य साधून दरवर्षी वन खात्यातर्फे इतर पर्यावरण संस्थांच्या मदतीने प्राण्यांची प्रगणना केली जाते. यंदाच्या प्राणी प्रगणनेच्यावेळी अतिदुर्मीळ माळढोक पक्ष्याच्या दर्शनासाठी सर्वांना उत्सुकता लागली होती. संपूर्ण महाराष्ट्रातील माळढोक पक्ष्याच्या अस्तित्वाची नोंद असलेले सोलापूर आणि विदर्भ ही दोनच ठिकाणे सर्वश्रूत आहेत. मात्र मागील दहा-पंधरा वर्षांपासून कधी तरी एखाद दुसरा माळढोक आढळून आल्याच्या नोंदी आहेत. सोलापूरच्या नान्नज माळढोक अभयारण्यात तर माळढोकच्या अस्तित्वाविषयी नेहमीच शंका घेतली जाते. तीन वर्षांपूर्वी माळढोकचे दर्शन घडले होते. त्यानंतर बुध्द पौर्णिमेला प्राण्यांच्या प्रगणनेच्यावेळी ऐटदार माळढोक मादीच्या दर्शनाने समस्त वन्यप्रेमींच्या चेहऱ्यांवर समाधानाची रेषा उमटली.



दैनिक
यश सिद्धि न्यूज
शनिवार दि.२५ मे २०२४


# संपादकीय

## अशा लोकांची सुटका नकोच..

शहराचे वाढलेले औद्योगिकीकरण, नोकरी व उद्योगाच्या निमित्ताने अन्य भागातून पुण्याकडे येत असलेले नागरिकांचे लोंढे, रोजगाराच्या संधीतून हाती खुळखुळत असलेला पैसा आणि त्या पैशाची रेस्टॉरंट, बार व पबमध्ये होत असलेली उधळपट्टी यामुळे या विद्येच्या शहराची विकृतीकडे वाटचाल होताना दिसते. बड्या बापाची मुले पैशाच्या मस्तीमुळे समाजाच्या मुळावर उठली आहेत. पुण्यातील कल्याणीनगर भागामध्ये बिल्डर विशाल अग्रवाल याच्या अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत दोन कोटींची कार भरधाव वेगाने चालवून दोघांना चिरडल्याची घटना अत्यंत संतापजनक आणि तितकीच चीड निर्माण करणारी आहे. बिल्डरपुत्राच्या मस्तवालपणामुळे दोन निष्पाप तरुणांचा मृत्यू झाला. हवेत चेंडू उडावा त्या पध्दतीने त्याने त्या दोघांना चिरडून मारले, असेच म्हणावे लागेल. ज्या पबमध्ये त्या मुलाने दारू ढोसली त्या पबच्या मालकालाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अल्पवयीन मुलाच्या हाती गाडी देऊन अपघातास कारणीभूत ठरल्याबद्दल पोलिसांनी विशाल अग्रवाल याच्याही मुसक्या आवळल्या आहेत. परंतु घटना घडल्यानंतर त्या मुजोर मुलास अद्दल घडविण्याऐवजी त्याच्या मदतीस जे धावले ते समाजाचे गुन्हेगारच आहेत. अजित पवार गटाचे आमदार सुनील टिंगरे यांनी पोलिसांवर दबाव आणून त्या अल्पवयीन मुलावर सौम्य कलम लावण्यास भाग पाडले, असा आरोप केला जात आहे. वास्तविक पाहता अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या त्या दोन तरुणांच्या नातेवाइकांच्या मदतीला धावण्याऐवजी गुन्हेगारांना साथ देणारे तितकेच दोषी असतात. पोलिसांनी ताब्यात घेऊन त्या अल्पवयीन मुलाला बालगुन्हेगार न्याय मंडळासमोर हजर केले. तेव्हा त्याला तत्काळ जामिनावर सोडण्यात आले. मात्र, न्यायमंडळाने जामिनासाठी जी अट घातली त्यातून बळी पडलेल्या त्या दोघांच्या नातेवाइकांची थट्टा केल्यासारखी आहे. त्या बेवड्या बाल गुन्हेगाराने पंधरा दिवस वाहतूक पोलिसांसमवेत वाहतुकीचे नियमन करावे. भविष्यात अपघात झाल्याचे दिसल्यास त्याने जखमींना मदत करावी आणि मानसोपचार तज्ज्ञांकडून त्याला उपचार करून घ्यावे लागतील असे न्यायालयाने सुचविले आहे. अशा सौम्य शिक्षेमुळे बड्या श्रीमंतांच्या मस्तवाल मुलांना चाप कसा बसेल? केंद्रीय मोटार वाहन कायद्यात अलीकडेच सुधारणा करण्यात आली आहे. त्यामध्ये अपघातात एखाद्याचा मृत्यू झाला तर त्या वाहन चालकास जबर शिक्षा आणि दंडाची तरतूद केली आहे. मात्र, वाहन चालक-मालक संघटनेच्या विरोधानंतर त्याला केंद्र सरकारने स्थगिती दिली आहे. परंतु, त्या स्थगितीतून अशा लोकांची सुटका होऊ नये.

पान १ वरुन

### मतदानाची आकडेवारी

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली होती. यावेळी न्यायालयाने सात दिवसांत उत्तर देण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. या प्रतिज्ञापत्रात, जर फॉर्म १७ क ची प्रत प्रसिद्ध केली, तर त्यामुळे गोंधळ उडू शकतो. तसेच संकेतस्थळावर प्रत प्रसिद्ध केल्यास त्याबरोबर छेडछाड करून त्याचा गैरवापर केला जाऊ शकतो. परिणामता सर्वसामान्य जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्र्वास उडू शकतो, अशी भीती निवडणूक आयोगाने व्यक्त केली होती.

कंडक्ट ऑफ इलेक्शन रुल्स १९६१ नुसार मतदान केंद्रावर फॉर्म १७ अ आणि फॉर्म १७ क अशी दोन कागदपत्रे जारी केली जातात. फॉर्म १७ अ मध्ये निवडणूक अधिकारी मत देण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक मतदाराची माहिती नोंदवतो. तर फॉर्म १७ क मध्ये एकूण मतदानाची माहिती नोंदवली जाते. फॉर्म १७ क मतदान संपल्यानंतर भरला जातो. त्याची एक प्रत प्रत्येक उमेदवाराच्या प्रतिनिधीला दिली जाते. एकंदरितच फॉर्म १७ क मध्ये एका मतदान केंद्रावर नोंदणीकृत मतदार आणि मतदान करणारे मतदार यांची माहिती असते. त्यावरून एकूण किती टक्के मतदान झालं, हे समजण्यास मदत होते.

### महाराष्ट्राच्या घशाला कोरड

गंगापूर धरणात अवघा २५ टक्के पाणीसाठी शिल्लक असल्यामुळे नाशिककरांच्या दारात पाणीटंचाईचं संकट येऊन उभं राहिलंय. एकूणच, महाराष्ट्राच्या घशाला कोरड पडलीय आणि डोक्यावर दुष्काळाचे ढग जमा झालेत. मराठवाड्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांना दुष्काळाचे प्रचंड चटके सहव करावे लागतायत. उसणवाऱ्या करून, कर्जकज्जे काढून पोटच्या पोराप्रमाणे जपलेल्या बागांनी शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत माना टाकल्या आहेत. राज्यातील धरणांचा तळ आता उघडा पडलाय. कधीकाळी पाण्याने ओसंडून वाहणाऱ्या अनेक जलाशयांमध्ये आता फक्त दिसतायत ते खडक आणि चिखल. त्यामुळे सरकारने या धूळमाखल्या भवतालात उपाययोजनांचं सिंचन करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### मेधा पाटकर दोषी! ..

हितसंबंधासाठी वापर केल्याचा आरोप मेधा पाटकर यांनी केला होता. सक्सेना यांच्याविरोधात मेधा पाटकर यांनी केलेली वक्तव्ये केवळ बदनामीकारकच नाहीत, तर ती नकारात्मक गोष्टींना चालना देतात असं निरीक्षण दिल्ली न्यायायलाने नोंदवलं आहे. न्यायालयाचे म्हणणे आहे की, मेधा पाटकर यांनी केवळ व्हीके सक्सेना यांची प्रतिष्ठा खराब करण्यासाठी चुकीची माहिती देऊन आरोप केले होते, हे नि:संदिग्धपणे सिद्ध झाले आहे.

### धाराशिव, तुळजापूरला..

प्रशासनाला सूचना देवून रस्त्यावर पडलेली झाडे हटवून वाहतूक खुली करून दिली. तसेच नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश धाराशिव व तुळजापूरच्या तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

धाराशिव व तुळजापूर तालुक्यातील भंडारवाडी, इर्ला, दाऊपूर, मंगरूळ, अणदूर, खुदावाडी, कुन्सावळी या परिसरात मोठ्या प्रमाणात वादळी वारे आणि पाऊस झाला. यात अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. तसेच लिंबू, पपई, केळी या बागायती पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. तहसीलदारांना तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नुकसानग्रस्तांना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करणार आहोत, असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नुकसानग्रस्तांशी बोलताना सांगितले.

### पुणे अपघात प्रकरण, विशाल ..

प्रयत्न केल्याचा गुन्हा त्याच्यावर दाखल करण्यात येणार. अल्पवयीन मुलासोबत कारमध्ये असलेल्या ड्रायव्हरला 'तू कार चालवत होता असं पोलिसांना खोटं सांग' असं विशाल अग्रवालने ड्रायव्हरला सांगितल्याचं पोलिस तपासात निष्पन्न झालं आहे. त्यामुळे पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा त्याच्यावर दाखल करण्यात येणार आहे विशाल अगरवालवर आरटीओच्या तक्रारीनंतर कलम ४२० च्या अंतर्गत दुसरा गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. पोर्शे कारची नोंदणी झालेली नसताना त्याची नोंद झाल्याची खोटी माहिती दिल्याबद्द्ल हा गुन्हा दाखल करण्यात येणार.

पुणे पोलिसांनी अपघाती गाडीचा संपूर्ण मार्ग तपासला आहे. १९ मे रोजी ती गाडी अग्रवाल यांच्या घरातून किती वाजता बाहेर पडली याचा देखील तपास केला. घरातून कोसी, तिथून ब्लॅक आणि तिथून अपघात स्थळापर्यंत संपूर्ण मार्गाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच फॉरेन्सिक पथकाकडून गाडीची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. अपघात झालेली महागडी गाडी ही अग्रवाल याच्या कंपनीच्या नावावर आहे. ती गाडी सध्या येरवडा पोलिसांच्या ताब्यात आहे.

मोठं व्हायला ओळख नाही
माणसांची मनं जिंकावी लागतात,
जगातील कुठल्याही तराजूत मोजता न येणारी
एकमेव मोठी वस्तू म्हणजे माणुसकी.

## पशुधनाचे ईअर टॅगिंग १ जूनपासून बंधनकारक



कोरोनानंतर सार्वत्रिक साथीचे आजार समाजासाठी आव्हान ठरत आहे. मनुष्य प्राण्यांसोबत पशुंनाही साथीच्या आजाराची मोठी किंमत चुकवावी लागली आहे. त्यामुळे आरोग्य व्यवस्था उपलब्ध करताना नोंदणी अभावी कोणतेही पशुधन वंचित राहू नये यासाठी आधार कार्ड च्या धरतीवर पशुंसाठी ईअर टॅगिंग केले जात आहे. सुदृढ, निरोगी व उपयोगी पशुधनासाठी १ जून पासून प्रत्येक पशूचे ईअर टॅगिंग आवश्यक करण्यात आले आहे. जनावरांची खरेदी विक्री करताना देखील ही बाब आवश्यक करण्यात आली आहे. याची समस्त शेतकऱ्यांनी, पशुपालकांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

राज्यातील सर्व पशुधनाची सर्वकष माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी. संभाव्य साथीच्या रोगाचे अंदाज व त्यादृष्टीने करावयाच्या उपाययोजनांचे नियोजन करणे सोयीचे व्हावे यादृष्टीने, एखाद्या भागात उद्भवणारे आजार विचारात घेवून उपाययोजना करणे, पशु व पशुजन्य उत्पादनात वाढ करण्याच्यादृष्टीने राज्यातील सर्व पशुधनाचे ईअर टॅगिंग करुन त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यात येत्या १ जून २०२४ पासून तर ईअर टॅग शिवाय पशुधनाची खरेदी-विक्री बंद करण्यात येणार आहे. पशुंना शासनाकडून देण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय संस्था, दवाखान्यातून देय होणाऱ्या पशुवैद्यकीय सेवा देय होणार नाहीत याचाही यात समावेश करण्यात आला आहे. याबाबत पशुपालकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्यावतीने सर्व पशुपालकांना नियमीतपणे करण्यात येत आहे.

पशुधनामधील सांसर्गिक रोगांना प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी तसेच प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम-२००९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व पशुधनास ईयर टॅगिंग करणे व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक केले आहे. बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या सर्व पशुधनास ईअर टॅगिंग करणे गरजेचे आहे. दिनांक १ जून २०२४ पासून तर ईअर टँग नसलेल्या पशुधनाची बाजार समित्या, आठवडी बाजार व गावा-गावातील खरेदी-विक्री करण्यास प्रतिबंध केला जाणार आहे. त्यामुळे ईअर टॅग नसलेले पशुधन बाजार समितीमध्ये आणले जाणार नाहीत व त्यांची खरेदी-विक्री होणार नाही याची दक्षता संबंधित बाजार समिती घेणार आहे.

१ जून २०२४ नंतर ईअर टॅगिंग शिवाय पशुधनास पशुवैद्यकीय संस्था,दवाखान्यांमधून पशुवैद्यकीय सेवा देय होणार नाहीत. जाणीवपूर्वक नष्ट केलेल्या पशुधनाची ईअर टॅगिंग व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर असल्याशिवाय त्यांना केंद्र व राज्य शासनाकडून देय असलेले आर्थिक सहाय्य देय होणार नाही. नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का तसेच वन्य पशुंच्या हल्लयामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास ईअर टॅगिंग केलेली नसल्यास नुकसान भरपाई रक्कम देय होणार नाही. राज्यातर्गंत विक्रीसाठी वाहतूक करण्यात येणाऱ्या राज्यातील पशुधनास ईअर टॅगिंग केल्याचे व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेतल्याची खात्री करूनच संबंधित पशुधन विकास अधिकारी यांनी आरोग्य प्रमाणपत्र, तसेच सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांनी वाहतुक प्रमाणपत्र द्यावे. पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंग असल्याशिवाय ती करता येणार नाही. तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदार यांच्यावर कार्यवाही होवू शकते. राज्यात विक्रीसाठी येणाऱ्या राज्याबाहेरील प्रत्येक पशुनास ईअर टॅगिंग केले नसल्यास तपासणी नाक्यावरील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी-कर्मचारी यांनी या पशुधनास ईअर टॅगिंग करुन घ्यावी. तसेच त्यांची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेण्यात यावी.

१ एप्रिल २०२४ पासून बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्रात पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंगशिवाय बंद आहे. तसेच १ जून २०२४ पासून ईअर टॅग नसलेल्या पशुधनाची बाजार समित्या, आठवडी बाजार व गावा-गावातील खरेदी-विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

त्यामुळे ईअर टॅग नसलेले पशुधन बाजारसमित्यामध्ये आणले जाणार नाहीत व त्यांची खरेदी विक्री होणार नाही याची दक्षता संबंधित बाजार समितीने घ्यावी. पशुधनाच्या मालकी हस्तांतरणाबाबतच्या नोंदी संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्वरीत अद्ययावत करुन घेण्याची जबाबदारी संबंधित पशुपालकांची राहील. ग्रामपंचायतीमध्ये पशुंच्या विक्री किंवा परिवर्तनाचा दाखला देताना पशुधनाची ईअर टॅगिंग झाल्याशिवाय तो देण्यात येवू नये. दाखल्यावर ईअर टॅगिंग क्रमांक नमूद करण्यात येणार आहे.

## ८.९९ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड २५ जून रोजी

**मुबंई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.९९ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची परतफेड दि.२४ जून, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि.२५ जून, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल,असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. २५ जून, २०२४ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/ त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.९९ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली., असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केलें जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे.

रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोक ऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणा-या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाद्वारे त्याचे प्रदान करील.

## बार्शी टेक्निकल हायस्कूल येथे माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साही वातावरणात संपन्न




**बार्शी/प्रतिनिधी**: तब्बल २२ वर्षांनी मित्रांची झाली भेट बार्शी टेक्निकल हायस्कूल मध्ये शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम शाळेमध्ये आयोजित करण्यात आला होता आपण ज्या शाळेमध्ये शिकलो त्या शाळेमध्ये पुन्हा विद्यार्थी म्हणून जाण्याची इच्छा आज पूर्ण झाली आम्हाला त्यावेळी जे वर्गशिक्षक होते ते देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते तब्बल २२ वर्षांनी शाळेमध्ये जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आज पुन्हा एक दिवसाची शाळा अनुभवली सर्व माजी शिक्षकांना भेटून बोलून त्यांचे आशीर्वाद घेऊन छान वाटले. सदर स्नेह मेळावा संमेलनमध्ये माजी विद्यार्थी व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला ज्यामधे डॉ.आदित्य साखरे , डॉ.देविदास इंगळे , मुंबई पोलिस मध्ये कार्यरत असणारी कु.अंजली वानी (झङख ) तसेच संतोष जाधव आणि आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळणाऱ्या माजी विद्यार्थिनी यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश दत्तू व डॉ.देविदास इंगळे यांनी पार पाडले. मित्रांना मैत्रिणींना भेटून जुन्या आठवणी ताज्या झाल्या हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर बिडवे, सचिन आग्रे, डॉ. देविदास इंगळे, नागेश बनशेट्टी, गणेश दत्तू, सचिन जाधव यांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# समाज एकता अभियान कडून साडी वाटप

**अकोला/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अकोला परिसरातील कळंबेश्र्वर येथे बुद्ध जयंतीनिमित्त समाज एकता अभियाना द्वारे मा. विनोद विरघट सर यांच्या कडून साड्यांचे वाटप करण्यात आले. समाज एकता अभियान महाराष्ट्रात सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय सहकार्य करून आंबेडकरवादी समाजाचे सामाजिक ऐक्य करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. समाज एकता अभियाना द्वारे सामाजिक बांधिलकी जोपासुन शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय सहकार्यासाठी मा. विनोद विरघट सर सतत प्रयत्न शिल असतात. समाजातील घटक एकत्र येऊन वैचारिक प्रबोधन व्हायला पाहिजे व समाजाला आपले काही देणे आहे ते आपण द्यायला पाहिजे या भावनेतून बुद्ध जयंतीनिमित्त साडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला बहुजन समाजातील अनेक महिला उपस्थिती होत्या. समाज एकता अभियान द्वारे मा. विनोद विरघट सरांनी आजपर्यंत



अनेक सामाजिक कामे करून समाजामध्ये सकारात्मक उर्जा भरण्याचे काम केले आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचनालय, वेगवेगळ्या रुग्णांना आर्थिक सहकार्य, तसेच इतरही अनेक सामाजिक कार्यात मा. विनोद विरघट सरांनी सढळ हाताने दान देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर जगण्याचा प्रयत्न करत आहेत. मा. विनोद विरघट सरांच्या माध्यमातून आज पर्यंत अनेक गरजु लोकांना खुप मोठा आधार मिळालेला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कमवणाऱ्या लोकांना संदेश दिला होता की आपल्या कमाईतील विसावा भाग अर्थात पाच टक्के वाटा समाजाच्या कल्याणासाठी खर्च करावा. मा. विनोद विरघट सर या पेक्षा ही जास्त खर्च करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाचे पालन करतात. समाज एकता अभियानाला सर्वोतोपरी सहकार्य करून समाज एकता अभियान महाराष्ट्रभर लोकांपर्यंत पोहचवण्यामध्ये मा. विनोद विरघट सरांचे खुप मोठे योगदान आहे. बुद्ध जयंती निमित्ताने साडी वाटपाच्या कार्याक्रमाला कळंबेश्र्वर येथील अनेक महिला तर समाज एकता अभियाना कडून मा. विनोद विरघट सरांच्या आई शांताबाई प्रल्हादराव विरघट, रवि अढाव, मा. विनोद विरघट सर, सुमेध घनबहादुर सर उपस्थित होते.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बुद्ध जयंती साजरी

**ठाणे/मिलिंद जाधव**

दि बुध्दिष्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा संस्थापक अध्यक्ष विष्वभूषण बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न अशोकराव आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाने व संकल्पनेतून डॉ. भीमराव रामजी आंबेडकर मल्टी स्टेट को. ऑ. क्रेडिट सोसायटी या बँकेच्या मुख्य कार्यालयात कल्याण ,ठाणे येथे दिनांक २३ मे २०२४ रोजी तथागत गौतम बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय कोषाध्यक्ष शशिकांत जाधव , महाराष्ट्र राज्य संस्कार प्रमुख रविकांत जाधव उत्तर कोकण विभाग अध्यक्ष रविंद्र शालिग्राम गुरचळ यांनी उपस्थितांना बुद्ध जयंती दिनाचे मोलाचे



मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमांचे नियोजन रमेश जाधव ,विलास जाधव ,यशवंत बिरारे , सूत्रसंचालन लिला पवार यांनी केले, व आभार प्रदर्शन रमेश जाधव यांनी केले.चंद्रकांत कांबळे यांनी धम्मपालन गाथा ( सरणतेय) घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी बिरारे परिवार यांचेतर्फे खिर दान व अल्पोहर देण्यात आले. तसेच बुद्ध जयंतीचे आयोजन ठाणे ,कल्याण, भिवंडी तालुक्याच्या पदाधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाला ठाणे जिल्ह्यातून मंगला बिरारे ताई, रमेश जाधव , चंद्रकांत कांबळे , यशवंत बिरारे ,लिला पवार ताई, वसुंधरा भस्मे ताई रंजना मुन ताई, दिलीप पवार , राहुल पवार, विलास जाधव , प्रशंजित मोहिते ,शिंदे अडसूळ , बागुल , पारवे ,गायकवाड इत्यादी उपस्थित होते. बुद्ध जयंती मंगल दिनाचे औचित्त साधून चार ते पाच बौद्ध बांधवांनी संस्थेचे सभासद होऊन बँकेचे शेयर घेऊन संस्थेचे धम्म दिक्षा सर्टिफिकेट देऊन त्यांना संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले.

# तथागत गौतम बुध्द यांच्या २५६८ व्या जयंतीची उत्साहात संपन्न

**करमाळा/प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकां पासुन सुरुवात झाली त्यावेळी बौद्धाचार्य सावता हरी कांबळे यांच्या मार्गदर्शकाने सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली व नंतर धम्मरॅली सुरुवात डॉ बाबासाहेब स्मारक पासुन सुरुवात करण्यात आली या धम्मरॅलीचे मुख्य आकर्षण डॉआंबेडकरवादी चळवळ व युवा भीमनगर लेझीम व भीमाची वाघीण संस्कृती कांबळे हीने आपल्या कलेचे प्रदर्शन करून उपस्थितांचे मने जिंकले यावेळी करमाळा शहरातील प्रमुख मार्गाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्प हार घालून अभिवादन केले व तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून आंबेडकर स्मारक येथे रॅलीचा समारोप करण्यात आला या धम्मरॅलीत भीमनगर सिद्धार्थनगर व सुंमत नगर येथील बौध्द बांधव उपस्थित होते या धन्म रॅलीला पोलिस प्रशासन चे विशेष सहकार्य लाभले व आभार प्रदर्शन मानून या धम्म रॅलीचा समारोप करण्यात आला

# हन्नूरच्या अनंत चैतन्य कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागाच्यावतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत महर्षि विवेकानंद समाजकल्याण मंडळ, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूरच्या विद्यार्थ्यांनी मागील यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले असून प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला.यात कु. स्नेहा महिबूब पटेल या विद्यार्थिनीने ८०.३३ गुण मिळवून चप्पळगाव परीक्षा केंद्रातून प्रथम आली तर कु. वर्षा लक्ष्मण गावडे ७७.३३ टक्के गुण प्राप्त करून प्रशालेतून द्वितीय व कु.शुभांगी सिद्धाराम भरमशेट्टी हिने तृतीय क्रमांक प्राप्त केली. या प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करण्यात आलेल्या विद्यार्थिनींचे संस्थेच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन,पेढा भरवून सत्कार करण्यात आले.या कौतुक सोहळ्यास संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक आदरणीय श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी,विज्ञान



विभागाच्या प्रमुख सौ. पुनम कोकळगी मॅडम, सौ. सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, हन्नूर प्रशालेचे मुख्याध्यापक विलास बिराजदार, पर्यवेक्षक अशोक साखरे,व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

# लोकसेवा मिळविण्यासाठी अडचणी आल्यास आयोगाकडे दाद मागा : आयुक्त डॉ.एन.रामबाबू

**अमरावती/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अमंलात आणला आहे. त्याद्वारे प्रत्येक शासकीय विभागाने पात्र व्यक्तींना लोकसेवा प्रदान करणे कायद्याद्वारे बंधनकारक केले आहे. या कायद्याद्वारे राज्य शासनाच्या विविध ३८ विभागाच्या एकूण ६४२ लोकसेवा अधिसूचित केलेल्या आहेत. त्यापैकी ४५१ सेवा ह्या ऑनलाईन पोर्टलवर प्रदान करण्यात येतात. नागरिकांनी कायद्याचे महत्त्व समजावून घेऊन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिकाधिक लोकसेवा ह्या ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करुन घेण्यासाठी 'आपले सरकार पोर्टलचा' वापर करावा तसेच अधिसूचित केलेल्या लोकसेवा प्राप्त करण्यामध्ये अडचणी येत असल्यास आयोगाकडे दाद मागावी, असे आवाहन राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. एन. रामबाबू, यांनी केले.

राज्य शासनाच्या विविध विभागाने अधिसूचना निर्गमित करुन अधिसूचित केलेल्या सेवांचा तपशिल, त्या प्रदान करण्यासाठी लागणारी विहित कालमर्यादा, सेवा प्रदान करणारे पदनिर्देशित अधिकारी, सेवा प्रदान करण्यास विलंब होत असल्यास किंवा दिरंगाई होत असल्यास करावयाच्या प्रथम व द्वितीय अपिलाबाबतची माहिती प्रसिद्ध केलेली आहे, अशी माहिती आयोगाने दिली आहे.

या कायद्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आलेली असून त्याचे मुख्यालय मुंबई येथे आहे. उर्वरित सहा महसूल विभागामध्ये आयोगाची प्रत्येकी एक विभागीय कार्यालय आहे. राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, अमरावती या कार्यालयाची स्थापना डिसेंबर २०२१ मध्ये करण्यात आली आहे. अमरावती महसूल विभागासाठी




डॉ. एन. रामबाबू,(भा.व. से.) (से. नि.) यांची आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या आयोगाचे कार्यालय 'कार्य आयोजना इमारत, पहिला मजला, वन विभाग, उर्ध्व वर्धा प्रकल्प वसाहत मार्ग, कॅम्प, अमरावती ४४४६०२' येथे कार्यरत आहे.

शासनाच्या विविध विभागानी अधिसूचित केलेल्या सेवा प्रदान करण्यामध्ये विलंब होत असल्यास अथवा दिरंगाई होत असल्यास, त्यानुषंगाने पात्र व्यक्ती या आयोगाकडे तृतीय अपिल दाखल करु शकतो, जास्तीत जास्त नागरिकांना या कायद्याची ओळख व्हावी यासाठी अमरावती विभागामध्ये झालेल्या विविध कृषि प्रदर्शनी, शासन आपल्या दारी कार्यक्रमांमध्ये आयोगातर्फे माहितीवर्धक स्टॉल लावण्यात आले होते. तसेच या कायद्याचा व्यापक प्रचार-प्रसार होण्यासाठी आकाशवाणीवर मुलाखती व ध्वनीफिती प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. याशिवाय अमरावती महसूल विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालय व इतर जिल्हास्तरीय तसेच उपविभागस्तरीय शासकीय कार्यालयांमध्ये आयोगाकडून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ बाबत सजगता आणण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम व आढावा बैठका आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या अपिल प्रकरणांवर आयोगाव्दारे कार्यवाही करण्यात आली आहे. यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी अधिसूचित असलेली लोकसेवा प्रदान करण्यामध्ये दिरंगाई अथवा दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या प्रकरणांमध्ये आयोगाकडून दंडात्मक कार्यवाही सुध्दा करण्यात आलेली आहे.

या कायद्याचे महत्व समजावून घेऊन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिकाधिक लोकसेवा ह्या ऑनलाईन पध्दतीने प्राप्त करुन घेण्यासाठी आपले सरकार पोर्टलचा सर्वसामान्य नागरिकांनी वापर करावा. तसेच अधिसूचित केलेल्या लोकसेवा प्राप्त करण्यामध्ये अडचणी येत असल्यास नागरिकांनी आयोगाकडे दाद मागावी, असे आवाहन राज्य सेवा हक्क आयोज आयुक्त डॉ. एन. रामबाबू यांनी केले आहे.

# फटाक्याच्या कारखान्यात स्फोट; दोघेजण गंभीर, धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा येथील प्रकार

धाराशिव : फटाके निर्मितीसाठी मराठवाड्यात प्रसिध्द असलेल्या वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील एका फटाका कारखान्यात अचानकपणे स्फोट होवून दोनजण गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली आहे. वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील संतोष फायर वर्क्स या फटाके निर्मितीच्या कारखान्यात शुक्रवारी अचानकपणे स्फोट झाला. या स्फोटामुळे कारखान्यातील फटाके निर्मितीचे साहित्य, दारू जळून खाक झाले आहे. तसेच या स्फोटामुळे दोनजण गंभीर जखमी झाले आहेत. स्फोट होताच परिसरातील ग्रामस्थांनी लागलेली आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत बहुतांश साहित्य जळून खाक झाले होते. दरम्यान या स्फोटामुळे कारखान्यात काम करीत असलेले दोनजण गंभीर जखमी झाले असून त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांना पुढील उपचारासाठी धाराशिव येथे हलविण्यात आले आहे. जखमी असलेल्या दोघांची नावे रात्री उशिरापर्यंत समजू शकली नाहीत.

दरम्यान या घटनेचा महसूल व पोलीस प्रशासनाने पंचनामा केला असून



जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी महसूल प्रशासनाला घटनेचा अहवाल तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान प्रशासनाने फटाका कारखान्यांत दुर्घटना होवू नयेत, यासाठी मार्गदर्शक सूचना घालून दिल्या होत्या. या सूचनांचे तंतोतंत पालन न केल्यास कारवाई करण्यात येणार असून उन्हाळ्यात एका खोलीत किती व कोणत्या फटाक्यांचा साठा असावा, याबाबतच्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे पालन झाले की, नाही याचा अहवाल जिल्हाधिकार्यांनी मागविला आहे. तेरखेडा येथे फटाके निर्मितीचे अनेक परवानाधारक कारखाने आहेत. परवाना देताना घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचना आणि नियमांचे पालन करण्यात आले की नाही, याची चौकशी करून त्याचा तत्काळ अहवाल मागविला आहे. कोणत्या कारखान्याने किती व कोणत्या केमिकल, दारू व अन्य साहित्याचा साठा केला, एका खोलीच्या आकारानुसार झालेली साठवणूक, घेण्यात आलेली खबरदारी आदी बाबी तपासण्याचे आदेश संबंधितांना दिले आहेत. अहवाल येताच दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

# तर आज पक्षाची ही अवस्था झाली नसती; शिरसाट यांचा उद्धव ठाकरेंना खोचक टोला

मुंबई : देशात लोकसभेच्या निवडणुकीसाठी पाच टप्प्यांत मतदान पार पडले. आता आणखी दोन टप्पे बाकी आहेत. महाराष्ट्रातील पाचही टप्प्यांतील मतदान पार पडलेले आहे.लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर काँग्रेसने स्नेहभोजनाचं आयोजन केलं होतं. या स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाला विशाल पाटील यांनी हजेरी लावल्यामुळे ठाकरे गटाने नाराजी व्यक्त केली.

तसेच शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संजय विभुते यांनी यावरून काँग्रेसला इशारा दिला होता. काँग्रेसने पृथ्वीराज पाटील आणि विशाल पाटील यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी करत आक्रमक भूमिका त्यांनी घेतली होती. यावरून आता शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी ठाकरे गटावर खोचक शब्दात टीका केली आहे. आमची भूमिका मान्य केली असती तर आज पक्षाची ही अवस्था झाली नसती, असा खोचक टोला त्यांनी लगावला.

सांगलीच्या ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखांनी नाराजी व्यक्त केली ती वस्तुस्थिती होती. अनेक ठिकाणी आम्ही सांगायचो की काँग्रेस आणि राष्ट्रवादी तुमच्याबरोबर राहणार नाही.

आता त्याचा अनुभव त्यांना सांगलीत आला. त्यांच्या सांगलीच्या जिल्हा प्रमुखांनी सांगितलं की, आम्हाला काँग्रेसने थोका दिला आहे. काँग्रेसने आम्हाला धोका दिला, त्याला सपोर्ट करायला राष्ट्रवादी होती. यापुढे आम्ही त्या पक्षाला विधानसभेची पायरी चढू देणार नाही, भलेही आमच्या पक्षाने कारवाई केली तरी, असं ते जिल्हाप्रमुख म्हणाले. अशीच भूमिका आमचीही होती. आमच्या त्या भूमिकेला सांगलीच्या जिल्हा प्रमुखांनी पुष्टी केली, असं संजय शिरसाट म्हणाले.

## ४ जूनला चारशे पार वर विजयाचा शिक्कामोर्तब होणार

# नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा प्रधानमंत्री होणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

रिपब्लीकन पक्ष देशभर भाजप एन डी ए ला मजबूतीने साथ देत आहे.उत्तर भारत ; दक्षिण भारत आणि संपूर्ण देशात मोदी सरकार बद्दल चांगले वातावरण आहे.जनतेची चांगली साथ मोदींना मिळत आहे. त्यामुळे येत्या ४ जून ला लोकसभेचा निकाल लागणार असून त्यात मोदींच्या चारशे पार च्या नाऱ्यावर विजयाचा शिक्कामोर्तब होणार आहे.काँग्रेस आणि इंडी आघाडी ने अनेक अफवा आणि दुषप्रचार केला असला तरी त्या काँग्रेस च्या अफवांचा चक्काचूर होणार आहे.नरेंद्र मोदी या देशाचे तिसऱ्यांदा प्रधानमंत्री नक्की होतील असा विश्र्वास आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी व्यक्त केला. मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर येथे रिपब्लिकन पक्षा तर्फे आयोजित पत्रकार परिषदेत ना. रामदास आठवले बोलत होते.देशभरातील २२ राज्यांचा दौरा एन डी ए चे स्टार प्रचारक ना.रामदास आठवलेंनी लोकसभा निवडणुकीत केला आहे. देशभर भाजप एन डी ए आघाडीतील उमेदवारांचा प्रचार केला आहे .नुकताच उत्तर प्रदेश हरयाणा पंजाब दिल्लीचा दौरा ना.रामदास आठवलेंनी केला असून आज त्याबाबत ची माहिती पत्रकार परिषदेत ना.रामदास आठवलेंनी दिली.

उत्तर प्रदेशात ७५ पेक्षा जास्त जागा भाजप जिंकणार आहे.उत्तर प्रदेशात भाजप ला राष्ट्रीय लोकदल: अपना दल ; रजभर पार्टी; निषाद पार्टी चा मोठा पाठिंबा राहिला आहे.रिपब्लिकन पक्षाची मोठी साथ भाजप ला मिळाली आहे. उत्तर प्रदेशात बीएसपीचा जनाधार कमी होत असून बीएसपीतून कार्यकर्त्यांचे रिपब्लिकन पक्षात प्रवेश मोठ्या प्रमाणांत होत आहे.आगामी काळात उत्तर प्रदेशात रिपब्लिकन पक्ष एक मोठी राजकीय शक्ती म्हणून उदयास येईल असा विश्र्वास ना. रामदास आठवलेंनी व्यक्त केला.

काँग्रेस आणि इंडी आघाडी ने सत्तेत येण्याची अनेक सप्न पहिली आहेत.चार जून नंतर मोदी जातील असे काँग्रेसच्या राहुल गांधीना स्वप्न पडत आहे.त्यांनी सत्तेत आल्यास महिलांच्या बँक खात्यात खटाखट खटाखट १ लाख रुपये टाकू अशी खोटी आशा दिली आहे.मात्र काँग्रेस चे सरकार काही येत नाही.पण ते खटाखट पैसे टाकत असतील तर आम्ही महिलांना सांगू तुम्ही पटापट पटापट ते पैसे घ्या. राहुल गांधीना माझे आवाहन आहे की त्यांचे सरकार येणार नाही मात्र सरकार आले नाही तरी त्यांनी कोट्यावधी महिलांच्या खात्यावर १ लाख रुपये खटाखट टाकावेत असे सांगत ना.रामदास आठवलेंनी राहुल गांधी आणि काँग्रेस इंडी आघाडीच्या सत्ता मिळण्याचा स्वप्नांचा जनता चक्काचूर करणार असल्याचा पुनरुच्चार केला. काँग्रेस आणि इंडी आघाडी ने दलित मुस्लिम जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न चालविला आहे.अनेक अफवा पसरवण्याचा प्रयत्न केला आहे.मात्र काँग्रेसला त्यात यश मिळणार नाही. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहून इतिहास घडविला आहे.ते या देशाच्या संविधानाचे शिल्पकार आहेत.संविधान कधीही कोणीही बदलू शकत नाही हे त्रिकाल सत्य आहे.मात्र तरीही संविधान बदलले जाईल अशी खोटी अफवा पसरवण्याचा आणि दलित जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा काँग्रेस इंडी आघाडीचा प्रयत्न फसला आहे.संविधान बदलण्याचा आरोप हा बिनबुडाचा आरोप आहे हे सत्य दलित जनतेला कळले असून संविधानाला कोणताही धोका नसल्याचा विश्र्वास



प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी देशाला दिला आहे. त्यामुळे काँग्रेस इंडी आघाडीच्या खोट्या अफवांना भिक न घालता दलित मुस्लिम ओबीसी जनतेने एन डी ए सोबत महायुती सोबत राहावे असे आवाहन ना.रामदास आठवलेंनी केले.

मोदींनी देशातील १४० कोटी जनता आपला परिवार असल्याचे म्हंटले आहे.त्यामुळे ते सर्वांचे आहेत.मोदी सरकार हे मुस्लिमविरोधी नाही.मुस्लिम समाजाला धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याचे चुकीचे घटनाबाह्य आश्र्वासन काँग्रेस देऊन घटनाविरोधी कृती करीत आहे.धर्माच्या आधारावर आरक्षण देऊ नये ही संविधानाची भूमिका आहे. संविधानाच्या भुमिकेविरुद्ध काँग्रेस जात आहे.असा आरोप ना.रामदास आठवलेंनी केला.

दलित आदिवासी या घटकांना मागासवर्गीय जाती जमाती म्हणून घटनेने आरक्षण दिले आहे.मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार मागास जाती म्हणून ओबीसींना आरक्षण देण्यात आले आहे.ओबीसी मध्ये मोठ्या प्रमाणात मुस्लिम जातींना आरक्षण मिळत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी नव्याने सुरू केल्या आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय

ई ड बल्यू एस चे १० टक्के आरक्षण देशभरात लागू असून त्याचा लाभ मुस्लिम समाजही घेत आहे.मोदी सरकार ने सुरू केलेल्या जन धन योजना; मुद्रा योजना; उज्ज्वला योजना; आयुष्यमान भारत योजना आणि मोफत अन्नधान्य योजना अशा अनेक योजनांचा देशभरातील मुस्लिमांनाही लाभ मिळाला आहे.त्यामुळे मोदी सरकार हे मुस्लिम विरोधी नाही. धर्माच्या आधारावर आरक्षण देऊ नये ही राज्यघटनेची भूमिका आहे.हिंदू मुस्लिम बौध्द ख्रिश्र्चन शीख कोणत्याही धर्माच्या आधारे आरक्षण देऊ नये ही संविधानाची भूमिका आहे तीच भूमिका प्रधानमंत्री नरेंद्र मोदींची भूमिका आहे. त्यामुळे मोदी हे संविधनिक भूमिका मांडत आहेत ते मुस्लिम विरोधी नाहीत असे ना. रामदास आठवलेंनी यावेळी स्पष्ट केले.राज्य घटनेला ; आरक्षणाला आणि लोकशाहीला कोणताही धोका नाही ; काँग्रेस आणि इंडी आघाडीतील पक्ष जनाधार संपत चालल्यामुळे धोक्यात आले आहेत.मोदींच्या नेतृत्वात भाजप आणि एन डी ए आघाडी मजबूत आहे.मोदी सरकार च्या काळात भारत देशाची अर्थव्यवस्था १० व्या क्रमांकावरून ५ व्या क्रमांकावर आलेली आहे.आत्मनिर्भर भारत; उत्कृष्ट रस्तेविकास; विमानतळांचे जागतिक दर्जाचे आधुनिकीकरण ; रेल्वेमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होत आहेत.त्यातून कोट्यावधी लोकांना रोजगार मिळत आहेत असे ना. रामदास आठवले म्हणाले.

काँग्रेस आणि इंडी आघाडीला बहुमत मिळणार नाही.त्यांच्या कडे प्रधानमंत्री पदाचा एकही उमेदवार नाही.त्यासाठी त्यांच्यात ऐक्य नाही.फुटीच्या उंबरठ्यावर इंडी आघाडी असून चार जून ला लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्या नंतर इंडी आघाडीची माळ फुटून विखरणार आहे. येत्या चार जून ला मोदी सरकार स्पष्ट बहुमत मिळवून पुन्हा तिसऱ्यांदा सत्तेवर येणार आहे असा विश्र्वास ना. रामदास आठवलेंनी व्यक्त केला.

# विश्ववंदनीय तथागत भगवान बुद्ध यांच्या २५६८ वी जयंती साजरी



**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा संस्थापक बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत महात्मा गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करण्यात आली.

राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय समर्थनगरअक्कलकोट येथे प्रथमता मान्यवराच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले ,व बुद्ध पूजा पाठ सामूहिक वंदना घेण्यात आली. यावेळी तालुका प्रवक्ता राजकुमार बनसोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्वतःच्या मनावर विजय मिळवणे, हे इतरावर विजय मिळवण्यापेक्षा अधिक कठीण काम आहे, त्यामुळे सर्वप्रथम स्वतःच्या मनावर विजय मिळवायला शिका . गौतम बुद्ध बुद्ध पौर्णिमेनिमित्त सर्वांच्या मनात प्रेम व शांतीचा प्रकाश उजळू देत हेच प्रार्थना बुद्ध पौर्णिमा तीन कारणासाठी विशेष आहे ते कारणे म्हणजे याच दिवशी गौतम बुद्धांचा जन्म झाला होता. याच दिवशी बुद्धांना ज्ञान प्राप्ती झाली होती .आणि याच दिवशी बुद्धाचे महानिर्वाण झालं होतं. या कार्यक्रमास मुख्य उपस्थिती, मेजर कमलाकर कांबळे (जिल्हा उपाध्यक्ष सोलापूर ढ इ ड ख ) राजकुमार बनसोडे सर शीर्षेल शिवशरण (ता .कोषाध्यक्ष) आ.दिलीप कुमार शिवशरण (सिव्हिल इंजिनिअर ) मा.अनिल बनसोडे(उद्योजक) आ.प्रकाश पोटे (सामाजिक कार्यकर्ते) आ. मल्लिकार्जुन भनगे सर, गुंजले दादा ,दुलंगे आ.दिलीप कदम साहेब .(राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय अध्यक्ष )तसेच अनेक बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते.

बुद्ध आशीर्वाद देत नाही, बुद्धशाप ही देत नाही. बुद्ध कोंबडे बकरे खात नाही, बुद्ध नवसालाही पावत नाही, बुद्ध अगरबत्ती मेणबत्ती ही मागत नाही. बुद्ध आस्तिक नाही ,नास्तिक ही नाही, बुद्ध वास्तविक आहेत.बुद्ध म्हणजे आचार ,विचार रीत आहे, बुद्ध म्हणजे वास्तविक आहे. बुद्ध मार्ग दाता आहे, जगण्याची आदर्श शैली म्हणजे बुद्ध. बुद्ध कोणाला पावत नाही, कोणावर कोपती नाही ,बुद्ध कोणाला आशीर्वाद देत नाही ,कोणाला शांती देत नाही. बुद्ध कोणाच्या अंगात येत नाही ,अंगात येणारे देव, भूत ,प्रेत ,आत्मा ,यांच्या अस्तित्व मात्र नकार तो ते स्वतःला देव म्हणून घेत नाही

बुद्धांना पूजा नकोय, ते कोणालाही भीती दाखवत नाही, ते जगण्याच्या मार्ग दाखवतात ,कारण बुद्धमुक्ती दाता नसून मार्ग दाता आहेत. कोणाचाही द्वेष न करणे म्हणजे बुद्ध. खरे बोलणे म्हणजे बुद्ध .देशाला प्रेमाने उत्तर देऊन शांतता प्रस्थापित करायला बुद्ध सांगतो . बुद्ध माणसाच्या मनाला महत्त्व देतो. मन चांगले करावे असे सांगतो .मनात वाईट विचार येऊ नयेत असे सांगतो .

बुद्ध कर्माला महत्त्व देतो. चांगले कर्म करा वाईट करू नका असे सांगतो . बुद्ध बुद्धीला महत्त्व देतोच पण बुद्धीपेक्षा सील ,नैतिकतेला जास्त महत्त्व देतो . अत्त दीप भव याचा अर्थ कोणाचेही अनुकरण न करता स्वयंप्रकाशित व्हा. व माझे सुद्धा अनुकरण करू नका. चिकित्सक व्हा साम्यक बुद्धीने विचार करा, बुद्ध सांगतो . जगाला सर्वप्रथम शांतीचा संदेश देऊन अखिल मानव जातीला आयुष्य कडे जाणे वळवलं त्या महामानव गौतम बुद्धाच्या जयंती निमित्त कार्यक्रम घेण्यात आले

# वागदरी येथे तथागत भगवान गौतम बुद्ध जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**वागदरी/एस.के.गायकवाड**

वागदरी ता.तुळजापूर येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या उत्साहाने व विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी,पंचशील बौद्ध विहार समिती आणि समस्त बौध्द बांधवांच्या वतीने वागदरी ता.तुळजापूर येथे दि.२३ मे २०२४ रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होत.प्रारंभी सकाळी ठिक ८.३० वा.दरम्यान जेष्ठ कार्यकर्ते मोहन वाघमारे, युवा कार्यकर्ते उत्तम गायकवाड (शिरवळ ता.अक्कलकोट), सामाजिक कार्यकर्ते रमेश जेटीथोर माजी उपसरपंच मुक्ताबाई वाघमारे यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करुन धाराशिव कृषीविकास प्रोड्युशर कंपनी लि.वागदरी(नळदुर्ग) च्या मुख्य प्रवर्तक तथा सामाजिक कार्यकर्त्या शिक्षाबाई रमेश जेटीथोर यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेण्यात आली. तर सायंकाळी ठिक ७.३० वा.दरम्यान तथागत भगवान गौतम बुद्ध जयंती निमित्ताने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरीचे अध्यक्ष संदीपान वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली सामुदायिकरित्या बुद्ध वंदना,धम्मदेशना व इ.१२ वी बोर्ड परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.सुरवातीस कार्यक्रमाचे अध्यक्ष संदीपान वाघमारे, पंचशील बुध्द विहार समितीचे अध्यक्ष नागनाथ बनसोडे, जेष्ठ कार्यकर्ते उत्तम झेंडारे, सामाजिक कार्यकर्ते रमेश जेटीथोर आदींच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करुन सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेऊन सामाजिक कार्यकर्त्या शिक्षाबाई रमेश जेटीथोर यांच्या हस्ते गावातील इ.१२ वी बोर्ड परीक्षेत




उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देऊन जयंती उत्सव कमिटीच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी संघमित्रा अशोक गायकवाड यांचे प्रभावशाली भाषण झाले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शिक्षाबाई जेटीथोर म्हणाल्या की तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आपली सर्वांगीण प्रगती साधण्याचा प्रयत्न करावा.

या सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन रिपाइं (आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन महादेव वाघमारे यांनी केले.यावेळी अनिल वाघमारे, वाल्मिक वाघमारे, शिवाजी वाघमारे, दत्तू नाना वाघमारे,बाबासाहेब वाघमारे, हणमंत वाघमारे, चंद्रकांत वाघमारे, सहादेव वाघमारे, सुर्यकांत वाघमारे, रमेश वाघमारे,गुरूनाथ वाघमारे, अण्णासाहेब वाघमारे, नितीन बनसोडे, दिपक वाघमारे, आप्पा भंडारे,माजी उपसरपंच कविता गायकवाड, गीताबाई झेंडारे, श्रीदेवी वाघमारे, ठकुबाई वाघमारे, जिजाबाई वाघमारे, वंदना वाघमारे,उज्वला वाघमारे, कमळाबाई वाघमारे, शकुंतलाबाई वाघमारे, कमलबाई धाडवे,स्वाती गायवाकड सह महिला,ग्रामस्थ युवा कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतापूरते पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करून काँग्रेसचा दुष्काळी जनतेच्या भावनेशी खेळ : प्रदीप खांडेकर

**मंगळवेढा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सध्या दुष्काळाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली असून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत आहे अशा परिस्थितीमध्ये आमदार समाधान आवताडे यांनी ज्या गावात पाण्याची टंचाई आहे अशा गावातील ग्रामपंचायत ला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देत प्रस्ताव आल्यानंतर तात्काळ त्या गावात टँकर सुरू करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत मात्र नुकत्याच लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहित्यामुळे कागदी घोडे नाचविण्याचे खेळ न पाहता काँग्रेसने मतदानाअगोदर ना 'प्रस्ताव ना कागद' थेट तालुक्याच्या दक्षिण भागामध्ये गावोगावी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करून आम्ही लोकांप्रती किती संवेदनशील आहोत हे दाखवून दिले होते, पण मतदान होताच काँग्रेसने सुरू केलेले पाण्याचे टँकर सर्रास गावातून बंद करत केवळ मते मिळवण्यापुरतेच आमदार प्रणिती शिंदे व काँग्रेसने टँकर सुरू करण्याचा स्टंट केला की काय? अशी चर्चा आता गावागावातील भोळ्याभाबड्या जनतेतून होऊ लागली असून काँग्रेसने लोकसभेला मते मिळवण्यापूरते पाण्याचे टँकर सुरू करून जनतेच्या भावनेशी खेळ केला असल्याचे मत जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व माजी सभापती प्रदीप खांडेकर यांनी व्यक्त केले आहे.



यावेळी बोलताना खांडेकर म्हणाले की,सध्या मंगळवेढा तालुक्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे अशा परिस्थितीमध्ये निवडणूक जाहीर होताच मतदारसंघाकडे ढुंकूनही न पाहणारे अनेकजण न केल्याच्या कामाचेही श्रेय घेण्यासाठी पुढे आले होते अनेकजणांनी म्हैसाळचे पाणी,टेंम्भूचे पाणी २४ गावचा प्रश्न्न मीच सोडवला म्हणूनही उर बडवून घेतल्याचे या मतदारसंघातील जनतेने पाहिले आहे तर आचारसंहिता असतानाही या मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींने दिवसरात्र जनतेच्या हितासाठी,मतदारसंघाच्या विकासासाठी प्रयत्न करत वारंवार जिल्हाधिकारी व प्रशासनाला विनंती करून नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी उपाययोजना करा टँकरचे प्रस्ताव तात्काळ मंजूर करा अशी विनंती करत भोसे प्रादेशिक योजनेसाठी सुमारे तीस लाखाचा निधी मंजूर करून घेत योजना सुरू ठेवण्यासाठी धडपड करून लोकांना गैरसोय होणार नाही याबाबत वारंवार पाठपुरावा केला तर काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी निवडणुकीपूरते मतदारसंघात येऊन मोठमोठ्या वल्गना करत तालुक्यातील भोळाभाबडा मतदार आपल्याकडे वळवण्यासाठी प्रयत्न करायचा व निवडणूक संपली की आपला पसारा आवरून निघून जायचं हा प्रकार केला असून निवडणुकीपुरतं स्वखर्चातून टँकर सुरू करत लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला हे या सामान्य गोरगरीब जनतेच्या लक्षात आलं असून त्यांच्या भुलभुलैय्याना बळी पडलेली जनता सध्या डोक्यावर हात मारून घेत आहे मतदान संपताच टँकर बंद करून मतापुरती केलेली स्टंटबाजी लोकांच्या लक्षात आली असून आगामी निवडणुकीत कोणत्या तोंडाने मतं मागणार हा सवाल मतदार विचारल्याशिवाय राहणार नाहीत असेही माझे सभापती प्रदीप खांडेकर यांनी बोलताना सांगितले